# प्रकरण चौथे

# बेरड समुदायाचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन आणि बदल

# प्रकरण चौथे

# बेरड समुदायाचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन आणि बदल

## प्रस्तावना :

माणगांव येथे बेरड ही जात खूप वर्षापासून रहात आहे. ही जात येथे स्थिर स्वरूपाचे जीवन जगत असून तिचे पारंपरिक व्यवसाय व जीवन पद्धती बदललेली दिसते. या जातीचा सामाजिक सर्वेक्षण पद्धती व मुलाखत तंत्रानुसार अभ्यास केला. यामध्ये बेरड जातीच्या ५० घरांचा अभ्यास केला आणि सांख्यिकीय स्वरूपाच्या माहितीचे पुढील प्रमाणे तिचे विश्लेषण या प्रकरणात केलेले आहे. अशा स्वरूपाचा अभ्यास यापूर्वी दुबे एस.सी. यांनी 'कमार जमात', दत्त मुजुमदार यांनी 'संथाळ जमातीतील सांस्कृतिक परिवर्तन' अभ्यासले तसेच ए.अय्यापन यांनी 'इराव जमातीतील सांस्कृतिक परिवर्तन' व 'मलबार हिल मधील नायडी जमातीचा समाजशास्त्रीय व शरीरशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास' केला आहे. एन.के.बोस यांनी 'जुआगं' जमातीतील लग्न विधी, नातेप्रथा, संघटना यांचा अभ्यास केला.

## बेरड समुदायाचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन आणि बदल

### लोकसंख्या :

माणगांवच्या जनगणना यादीत जातीची लोकसंख्या ९५२ इतकी नोंदलेली आहे. या समाजातील कायम राहणाऱ्या बेरड जातीच्या लोकांचा अभ्यास केला आहे. त्यानुसार या जातीची लोकसंख्या ९५२ हीच गृहीत धरून खालील प्रमाणे निष्कर्ष काढलेले आहेत.

**सारणी क्र. ४.१**


**बेरड समुदायाची एकूण लोकसंख्या दर्शविणारी माहिती**

| अ.क्र. | लिंग | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पुरूष | २१२ | २२.२६% |
| २ | स्त्रिया | २२५ | २३.६४% |
| ३ | मुले | २७५ | २८.८८% |
| ४ | मुली | २४० | २५.२२% |
| | **एकूण** | **९५२** | **१00 %** |

वरील सारणीवरून बेरड समुदायातील (१००%) एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात पुरूषांचे शेकडा प्रमाण २२.२६% स्त्रियांचे २३.६४% मुलांचे २८.८८% तर मुलींचे २५.२२% इतके दिसते. बेरड समुदायातील फक्त पुरूषांचे च स्त्रियांचे प्रमाण पाहिले असता असे दिसून येते की बेरड समुदायातील एकूण पुरूषांचे प्रमाण हे एकूण लोकसंख्येशी ५१.१४% आहे तर स्त्रियांचे एकूण प्रमाण ४८.८६% इतके आहे. पुढील आलेखात हे प्रमाण दर्शविलेले आहे.

**आलेख क्रमांक ४.१**

**बेरड समुदायाची एकूण लोकसंख्या दर्शविणारा आलेख**




माणगांव गाव, अनुसूचित जाती व बेरड समुदाय यांच्या लोकसंख्येची तुलना खाली दिलेल्या सारणीत केलेली आहे.

**सारणी क्रमांक ४.२**

**एकूण लोकसंख्या दर्शविणारी माहिती**

| अ.क्र. | स्थान | स्त्री | पुरूष | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | माणगाव | १८१५(५०.१२%) | १८०६ (४९.८८%) | ३,६२१ (१००%) |
| २ | बेरड समुदाय | ४६५(१२.८४%) | ४८७ (१३.४५%) | ९५२(२६.२९%) |
| ३ | अनुसुचित जाती | २५१ (६.९३%) | २५५ (७.०४%) | ५०६(१३.९७%) |
| ४ | अनुसूचित जमाती | २ (०.०५%) | ३ (०.०८%) | ५(०.१३%) |


वरील सारणीवरून माणगांव व माणगाव गावातील अनुसूचित जाती लोकसंख्येची तुलना केली असता असे दिसून येते की, एकूण माणगांव गावच्या लोकसंख्येशी एकूण

अनुसूचित जातीची लोकसंख्या १३.९७% आहे व बेरड समुदायाची लोकसंख्या माणगाव गावातील एकूण लोकसंख्येच्या २६.२९% आहे. म्हणजेच अनुसूचित जाती-जमाती व बेरड समुदाय यांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येशी ४०.४०% इतकी आहे. याचाच अर्थ असा की माणगांव गावातील बेरड समाज आणि अनुसूचित जाती समाजाची लोकसंख्या ही माणगांव गावातील सवर्ण समाजापेक्षा फक्त २०% ने कमी आहे. वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की माणगाव गावाच्या एकूण लोकसंख्येचा विचार केला असता एकूण लोकसंख्येपैकी स्त्रियांचे प्रमाण ५०.१२% इतके आहे तर पुरूषांचे प्रमाण ४९.८८% इतके आहे. वरील टक्केवारी वरून असे निदर्शनास येते की माणगांव गावामध्ये स्त्रियांचे आणि पुरूषांचे प्रमाण जवळपास समान असलेले दिसते.बेरड समुदायाचा विचार केल्यास वरील सारणीवरून असे दिसून येते की स्त्रियांचे प्रमाण १२.८४% तर पुरूषांचे प्रमाण १३.४५% आहे.म्हणजेच या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की बेरड समुदायामध्ये पुरूषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण थोडे कमी आहे.

अनुसूचित जातीच्या संदर्भात विचार केल्यास एकूण अनुसूचित जातीच्या लोकसंख्येपैकी स्त्रियांचे प्रमाण ६.९३% आहे तर पुरूषांचे प्रमाण ७.०४% इतके आहे. ह्या आकडेवारीवरून असे दिसून येते की अनुसुचित जातीतील स्त्री-पुरूषांचे प्रमाण जवळपास सारखे आहे. वरील सारणी क्र.४.२ च्या संपूर्ण माहितीचे विश्लेषण आलेखावरून जास्त स्पष्ट होईल.

**आलेख क्रमांक ४.२**

**एकूण लोकसंख्या दर्शविणारा आलेख**



बेरड समुदायातील मुलाखत अनुसूचीद्वारे मुलाखत घेतलेल्या उत्तरदात्यांची वयोगटानुसार विभागणी केलेली आहे. ती पुढील सारणी क्र.४.३ वरून स्पष्ट होते.

**सारणी क्र.४.३**


**बेरड समुदायातील उत्तरदात्यांची वयोगटानुसार केलेली विभागणी दर्शविणारी माहिती**

| अ.क्र. | उत्तरदात्यांचे वयोगट | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ३५ ते ४५ वर्षे | १० | २०.० |
| २ | ४६ ते ५५ वर्षे | २० | ४०.० |
| ३ | ५६ ते ६५ वर्षे | १० | २०.० |
| ४ | ६६ ते ७५ वर्षे | २ | ४.० |
| ५ | ७६ ते ८५ वर्षे | ६ | १२.० |
| ६ | ८६ ते ९५ वर्षे | २ | ४.० |
| | एकूण | ५० | १००.० |

वरील सारणी क्र.४.३ वरून असे स्पष्ट होते की बहुतांशी उत्तरदाते हे ४६ ते ५५ वर्षे (४0%) या वयोगटातील आहेत. त्याची वारंवारिता २० इतकी आढळून आली. तसेच ३५ ते ४५ वर्षे व ५६ ते ६५ वर्षे (२0%) या वयोगटातील उत्तरदात्यांची वारंवारिता समान म्हणजे १० इतकी आढळून आली. तर ६६ ते ७५, ७६ ते ८५ व ८६ ते ९५ वर्षे वयोगटातील उत्तरदात्यांची वारंवारिता अनुक्रमे २(४%), ६(१२%) व २(४%) इतकी आढळून आली. याचाच अर्थ असा की बेरड समुदायामध्ये वयस्कर उत्तरदात्यांची संख्या खुपच कमी आहे. प्रस्तुत सारणी क्र.४.३ चे विश्लेषण आलेखाद्वारे व्यवस्थित स्पष्ट होईल.

**आलेख क्रमांक ४.३**

**बेरड समुदायातील उत्तरदात्यांची वयोगटानुसार केलेली विभागणी दर्शविणारा आलेख**



मुलाखत अनुसूचिद्वारे उत्तरदात्यांची जेव्हा मुलाखत घेतली गेली तेव्हा त्या उत्तरदात्यांमध्ये काही स्त्रिया आणि काही पुरूषांचा समावेश होता. त्यांचे प्रमाण किती होते ते पुढील सारणी क्र. ४.४ मध्ये स्पष्ट केलेले आहे.

**सारणी क्र. ४.४**

**बेरड समुदायातील उत्तरदात्यांची लिंगानुसार केलेली विभागणी दर्शविणारी माहिती**

| अ.क्र. | उत्तरदात्यांचे लिंग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुरूष | ४२ | ८४.0 % |
| २ | स्त्रिया | ८ | १६.0 % |
| | **एकूण** | **५0** | **१00 %** |

वरील सारणी क्र.४.४ वरून असे दिसून येते की वहुसंख्य (८४%) उत्तरदाते हे पुरूष आहेत तर उर्वरीत (१६%) उत्तरदाते ह्या स्त्रिया आहेत. वरील सर्व उत्तरदाते हे कुटुंबप्रमुख आहेत. त्यावरून असे निष्पन्न होते की सर्वात जास्त (८४%) उत्तरदाते कुटुंबप्रमुख पुरूष असल्याने वेरड ही जात पितृसत्ताक कुटुंवपद्धतीची आहे. सामाजिक सर्वेक्षणात मिळालेल्या माहितीवरून या जातीतील स्त्री व पुरूष दोघांपैकी कोणीही एक कुटुंबप्रमुख असल्याचे आढळते. ५0 कुटुंबाच्या केलेल्या पाहणीत ४२ कुटुंबप्रमुख पुरूष व ८ कुटुंबप्रमुख स्त्रिया आढळून आल्या. ज्या स्त्रिया विधवा किंवा परितक्त्या आहेत अशा कुटुंबामध्ये मुले मोठी झाल्यानंतर कुटुंबप्रमुख बनतात अशी एकूण २ कुटुंबे आढळून आली.

वेरड समुदायातील उत्तरदात्यातील कुटुंब प्रमुखांची वैवाहिक स्थिती खालील सारणी क्र.३.५ मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र. ४.५**

**बेरड समुदायातील उत्तरदात्यातील कुटुंबप्रमुखांची वैवाहिक स्थिती दर्शविणारी माहिती**


| अ.क्र. | उत्तरदात्यांची वैवाहिक स्थिती | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विवाहित | ३९ | ७८.0 % |
| २ | विधवा | २ | ४.0 % |
| ३ | विधूर | ९ | १८.0 % |
| | **एकूण** | **५0** | **१00 %** |

वरील प्रस्तुत सारणी क्र.४.५ मध्ये वेरड समुदायातील उत्तरदात्यातील कुटुंबप्रमुखांची

वैवाहिक स्थिती दर्शविली आहे. त्याप्रमाणे बहुसंख्य (७८%) उत्तरदाते विवाहित आहेत. त्यानंतर विधूर (१८%) आहेत तर सर्वात कमी (४.0%) संख्या विधवांची आहे. सदर माहितीचे विश्लेषण आलेखाद्वारे स्पष्ट केलेले आहे.

**आलेख क्रमांक ४.४**

**बेरड समुदायातील उत्तरदात्यातील कुटुंबप्रमुखांची वैवाहिक स्थिती दर्शविणारा आलेख**




बेरड समुदायातील उत्तरदात्यांना मुलाखत अनुसूचीच्या दरम्यान तुमची मातृभाषा कोणती किंवा तुम्ही कोणत्या बोलीभाषेचा वापर करता ? असा प्रश्न विचारला असता सर्व उत्तरदात्यांनी एकच उत्तर दिले की आम्ही मराठी व कन्नड अशा दोन्ही बोलीभाषेचा वापर करतो. स्वत:च्या कुटुंबामध्ये व समुदायामध्ये कन्नड भाषेचा तर इतर बाहेरील लोकांमध्ये किंवा समाजामध्ये मराठी भाषेचा वापर बेरड समुदायातील लोक करतात.

जेव्हा मुलाखत अनुसूचीचा वापर करून माहिती गोळा केली गेली तेव्हा असे लक्षात आले की, बेरड समुदायातील बहुसंख्य उत्तरदाते हे निरक्षर आहेत. त्यांचे प्रमाण किती आहे याची माहिती पुढील सारणी क्र.४.६ मध्ये दिलेली आहे.

## सारणी क्र.४.६

### बेरड समुदायातील उत्तरदात्यातील कुटुंबप्रमुखांची साक्षरता प्रमाण दर्शविणारी माहिती

| अ.क्र. | उत्तरदात्यांची वैवाहिक स्थिती | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | साक्षर | १० | २०.० % |
| २ | निरक्षर | ४० | ८०.० % |
| | **एकूण** | **५०** | **१०० %** |

वरील सारणी क्र.४.६ वरून असे दिसून येते की, वेरड समुदायातील बहुसंख्य (८०.0) उत्तरदाते कुटुंव प्रमुख हे निरक्षर आहेत. तर उर्वरीत (२०.0%) उत्तरदाते कुटुंबप्रमुख हे साक्षर आहेत. अशी स्थिती जरी असली तरी सामाजिक सर्वेक्षण केल्यानंतर असे दिसून आले की उत्तरदात्यांच्या मुलांमधील साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. ज्यावेळी मुलाखती दरम्यान तुमच्या कुटुंबामध्ये साक्षर व्यक्ति आहे का ? असा प्रश्न विचारला असता बहुसंख्य (९४.0%) उत्तरदात्यांनी होय असे उत्तर दिले तर उर्वरित (६.0%) उत्तरदात्यांनी नाही असे उत्तर दिले.

मुलाखत अनुसूचिच्या सर्वेक्षणानंतर असे दिसून येते की, वेरड समुदायातील बहुसंख्य (७८.0%) उत्तरदात्यांचे जन्मस्थान माणगांव हे असून उर्वरीत (२२.0%) उत्तरदात्यांचे जन्मस्थान कर्नाटकमधील वेळगाव हे आहे. आणि सर्व उत्तरदाते हे अजूनही आपल्या जन्मस्थानाशी संपर्क ठेवत आहेत.

## सारणी क्र.४.७

### बेरड समुदायातील लोकांची पूर्वीची व सद्यपरिस्थितीची वैवाहिक स्थितीची तुलनात्मक माहिती

| अ. | परिवर्त्य | उत्तरांचे प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | तुम्ही अजूनही पारंपरिक पद्धतीनेच लग्न करता का ? | होय | २६ | ५२.० % |
| | | नाही | २४ | ४८.० % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |
| २ | पूर्वी स्त्रिचा विवाह कितव्या वर्षी करत होता? | ५-१० वर्ष | २९ | ५८.० % |
| | | ११-१५ वर्ष | २१ | ४८.० % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | सद्य परिस्थितीत कितव्या वर्षी करता ? | १६- २० वर्षे | **५०** | **१०० %** |
| ४ | पुर्वी पुरूषांचा विवाह कितव्या वर्षी करत होता | ११-१५ वर्षे | २९ | ५८.0% |
| | | १६-२० वर्षे | २१ | ४२.0 % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |
| ५ | सद्यपरिस्थितीत कितव्या वर्षी करता ? | २१-२५ वर्षे | ५० | १०० % |
| ६ | पूर्वी मुलगीच्या होणाऱ्या भावी नवऱ्याबावत कोणत्या गोष्टींचा विचार केला जात होता ? | शिकलेला | १९ | ३२.0 % |
| | | नोकरी करणारा | २९ | ५८.0 % |
| | | शेतकरी | ५ | १0.0 % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |
| ७ | सद्यपरिस्थितीत कोणत्या गोष्टींचा विचार केला जातो. | नोकरी करणारा | ३० | ६0.0 % |
| | | शिकलेला | २० | ४0.0 % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |
| ८ | पूर्वी लग्न करताना मुलांचा विचार केला जात होता का ? | नाही | **५०** | **१०० %** |
| ९ | सद्यस्थितीत करता का ? | होय | **५०** | **१०० %** |
| १० | पूर्वी मुला-मुलींचे लग्न नात्यामध्येच करत होता का? | होय | ५० | १०० % |
| ११ | सद्यपरिस्थितीत नात्यामध्येच करता का ? | होय | ३० | ६0.0 % |
| | | नाही | २० | ४0.0 % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |
| १२ | हुंड्याला मान्यता देता का ? | होय | ५० | १०० % |
| १३ | तुमच्या समुदायात एकापेक्षा जास्त विवाह होत होते का? | होय | ५० | १०० % |
| १४ | सद्यपरिस्थितीत पूर्नविवाहाला मान्यता आहे का ? | होय | ५० | १०० % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | तुमच्या मध्ये आंर्तविवाह व बर्हिविवाह होत होते का? | नाही | ५० | १०० % |
| १६ | सद्यपरिस्थितीत होतात का ? | नाही | ५० | १०० % |
| १७ | पूर्वी लग्न विधी किती दिवस चालत होते ? | २ दिवस | ३७ | ७४ .० % |
| | | ३ दिवस | १३ | २६ .० % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |
| १८ | सद्यस्थितीत किती दिवस चालतो ? | २ दिवस | ५० | १०० % |
| १९ | तुमच्या समाजात घटस्फोट रूढ आहे का? | होय | ५० | १०० % |
| २० | सद्यपरिस्थितीत घटस्फोट रूढ आहे का? | होय | ५० | १०० % |
| २१ | घटस्फोटाची पद्धत कशी होती? | जात पंचायतमार्फत | ५० | १०० % |
| २२ | सद्यपरिस्थितीत कशी आहे ? | कोर्टा मार्फत | ५० | १०० % |
| २३ | घटस्फोटानंतर मुलांची जबाबदारी कोणाकडे होती ? | पत्नीकडे | ५० | १०० % |
| २४ | सद्यपरिस्थितीत कोणाकडे आहे ? | पत्नीकडे | ५० | १०० % |
| २५ | पूर्वी लग्नासाठी किती रूपये खर्च करत होता ? | ५०१-१००० | २८ | ५६ .० % |
| | | १००१-२००० | २२ | ४४ .० % |
| | | **एकूण** | **५०** | **१०० %** |
| २६ | सद्यपरिस्थितीत किती रूपये खर्च करता ? | ५०,००१ - ७०,००० | २६ | ५२ .० % |
| | | ७०,००१ - ८०,००० | १९ | ३८ .० % |
| | | ८०,००१ - १,००,००० | ५ | १० .०% |
| | | **एकूण** | **५०** | **१०० .०%** |
| २७ | पूर्वी लग्नाची पद्धत कशी होती ? | ॲरेंज मॅरेज | ५० | १०० .०% |
| २८ | सद्यस्थितीत कशी आहे ? | ॲरेंज मॅरेज | ५० | १०० .०% |

वरील सारणी क्र.४.७ मध्ये मुलाखत अनुसूचीद्वारे समुदायातील उत्तरदात्यांकडून त्यांच्याच समुदायातील लोकांची पूर्वीची व सद्यस्थितीची वैवाहिक स्थितीची गोळा केलेली तुलनात्मक माहिती दिलेली आहे तिचे विश्लेषण खालीलप्रमाणे...

## पारंपरिक पद्धतीनेच विवाह :

वेरड समुदायातील ५२.0% लोक हे अजूनही पारंपरिक पद्धतीनेच विवाह करतात. तर उर्वरित ४८.0% लोक हे आधुनिक पद्धतीने विवाह करताना दिसतात. पारंपरिक पद्धतीने विवाह करणाऱ्यांची संख्या व आधुनिक पद्धतीने विवाह करणाऱ्यांची संख्या यांची तुलना केली तर जवळपास सारखीच दिसून येते.

## स्त्रियांचा विवाह :

वहुतांशी (५८%) वेरड लोक स्त्रियांचा विवाह हा तिच्या वयाच्या 0५ ते १0 वर्षाची असताना करीत होते तर उर्वरित (४२%) लोक तिचे वय १0-१५ वर्षाची असताना करीत होते. सद्यपरिस्थितीत स्त्रियांचा विवाह वेरड समुदायातील लोक (१00%) तिच्या वयाची १६ ते २0 वर्षे पूर्ण झाल्यानंतर करताना दिसतात.

## पुरूषांचा विवाह :

बहुतांशी (५८%) वेरड लोक पूर्वी पुरूषांचा विवाह हा त्याच्या वयाच्या ११ ते १५ व्या वर्षी करीत होते तर उर्वरित (४२%) बेरड लोक त्याच्या वयाच्या १६-२0 व्या वर्षी करीत होते. सद्यपरिस्थितीत मात्र पुरूषांचा विवाह सर्व (१00%) वेरड समुदायातील लोक त्याच्या वयाची २१ ते २५ वर्ष पूर्ण झाल्यानंतर करतात.

## भावी नवऱ्या बाबतच्या अपेक्षा :

पूर्वीच्या परिस्थितीत वेरड समुदायात आपल्या मुलीचे लग्न करीत असताना तिच्या होणाऱ्या भावी नवऱ्यावावत वेगवेगळ्या अपेक्षा ठेवत असत. त्यामध्ये बहुतांशी (५८.0%) वेरड लोकांची अपेक्षा ही की होणारा भावी नवरा हा नोकरी करणारा असावा. तर उर्वरीत (३२.%) लोक शिकलेला असावा तर सर्वात कमी (१0.0%) लोक हे शेतकरी असावा अशी

अपेक्षा ठेवत होते. सद्यस्थितीत मात्र बहुतांशी (६०.०%) वेरड लोक हे भावी नवरा नोकरी करणारा असावा तर उर्वरीत (४०.०%) लोक हे शिकलेला असावा अशी अपेक्षा ठेवतात.

## विवाह करताना मुलांचा विचार केला जातो का?

पुर्वी वेरड समुदायातील सर्व (१००%) लोक आपल्या मुला-मुलींचा विवाह करताना त्यांच्या मनाचा विचार करत नसत. परंतु सद्यपरिस्थितीत मात्र या स्थितीत वदल्याचे दिसून येते. आजच्या स्थितीत सर्व (१०० %) बेरड लोक आपल्या मुलांचा विवाह करताना त्यांचा विचार प्रथम विचारात घेतात. त्यांचा निर्णय ते महत्वाचा मानतात.

## नात्यामध्येच विवाह :

पूर्वी वेरड समुदायातील सर्वच (१००%) लोक आपल्या मुली-मुलींचा विवाह नात्यामध्येच करत होते. नात्यामध्येच विवाह करण्याचे कारण विचारले असता पुढील कारणे दिसून आली ती म्हणजे, नाती टिकावी म्हणून, आपली मुलगी आपल्या घरात यावी म्हणून तसेच आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे ही प्रमुख कारणे होय. सद्यस्थितीत वेरड समुदायातील बहुसंख्य (६०.०%) लोक हे आपल्या मुलामुलींचे विवाह आपल्याच नात्यात करतात. तर उर्वरीत (४०.०%) लोक मात्र करीत नाहीत.

## हुंड्याला मान्यता :

वेरड समुदायातील सर्वच (१००%) लोक विवाहामध्ये हुंड्याला मान्यता का देता? असा प्रश्न विचारला होता तेव्हा उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून असे स्पष्ट होते. की बहुतांशी (७६%) लोकांच्या मते हुंडा घेणे हे बेरड जातीमध्ये एक प्रथा आहे तर उर्वरीत (२४%) लोकांच्या मते स्वत:च्या मुलीच्या लग्नामध्ये हुंडा देण्यासाठी घेतला जातो.

## पुर्नविवाह मान्यता :

पूर्वी वेरड समुदायात पूर्नविवाहाला मान्यता होती. त्यांच्या समुदायात एकापेक्षा जास्त विवाह होत होते. सद्यस्थितीत ही बेरड समुदायात पूर्नविवाहाला मान्यता आहे. तसेच त्यांच्यामध्ये एकापेक्षा जास्त विवाह ही होतात.

### आंर्तविवाह व बर्हिविवाह :

पुर्वी बेरड समुदायामध्ये आंर्तविवाह व बर्हिविवाह होत नव्हते. तसेच ते सद्यपरिस्थितीतही होत नाहीत. आंर्तविवाह व बर्हिविवाह होत नसल्याचे कारण विचारले असता उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून असे स्पष्ट होते की पूर्वी तशी समाज मान्यता नव्हती व ती आजही नाही.

### विवाह विधीचा कालावधी :

वरील सारणी क्र.३.७ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे स्पष्ट होते की पूर्वी बहुतांशी (७४%) लोक विवाह (लग्न) विधी दोन दिवस करत होते. तर उर्वरीत (२६.%) लोक मात्र तीन दिवस विवाह विधी करत होते. सद्यपरिस्थितीत मात्र बेरड समुदायातील सर्वच (१00%) लोक विवाह विधी दोन दिवसामध्ये करतात.

### घटस्फोट:

तुमच्या समुदायात घटस्फोट रूढ आहे का ? असा प्रश्न विचारला असता मिळालेल्या माहितीवरून असे स्पष्ट होते की, पूर्वी बेरड समुदायात घटस्फोट रूढ होता व तो आजही आहे. नमुन्यातील उत्तरदात्यांना घटस्फोटामागची कारणे विचारली असता पुढील कारणे आढळून आली, पाहिले कारण (३४%) म्हणजे समाजमान्यता होती दुसरे कारण (२६%) म्हणजे कुटुंबातील भांडण तंटा सोडविण्यासाठी आणि तिसरे कारण (२६%) म्हणजे वधु-वर पक्षावरील अन्याय दूर करण्यासाठी इ. होत.

### घटस्फोटाची पद्धत :

पूर्वी बेरड समुदायात विवाहामधील घटस्फोटाची पद्धत ही जात पंचायतमार्फत होती तर सद्यपरिस्थितीत घटस्फोटाची पद्धत ही कोर्टामार्फत होते.

### घटस्फोटानंतर मुलांची जबाबदारी :

पूर्वी तुमच्या समुदायात पती-पत्नीमधील घटस्फोटानंतर त्यांच्या मुलांची जबाबदारी कोणाकडे होती? असा प्रश्न विचारला तेव्हा उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की

पती-पत्नीच्या घटस्फोटानंतर त्यांच्या मुलांची जबाबदारी ही पूर्वी पत्नीकडे होती व सद्यपरिस्थितीतही पत्नीकडेच असते.

## विवाहासाठी खर्च :

पूर्वी मुला-मुलींच्या विवाहासाठी बेरड समुदायातील बहुसंख्य (५६%) लोक हे ५०१ ते १000 रू. इतका खर्च करीत होते तर उर्वरीत (४४.0%) लोक १00१ ते २000 इतक्या दरम्यान करीत होते. सद्यपरिस्थितीत मात्र या विवाहासाठी होणाऱ्या खर्चात खूपच बदल झालेला दिसून येतो. आजच्या स्थितीत बहुसंख्य (५२%) लोक हे ५0,00१ ते ७0,000 हजार रूपये इतका करतात. तर काही लोक (३८%) लोक हे ७0,00१ ते ८0,000 हजार रूपये इतका करतात. सर्वात कमी (१0.0%) लोक आहेत जे ८0,00१ ते १,00,000 रूपये पर्यंत खर्च करताना दिसतात. हे सर्व लोक आपल्या आर्थिक कुवतीनुसार खर्च करतात.

## विवाह पद्धत :

पूर्वी तुमच्या समुदायात विवाहाची पद्धत कशी होती ? असा प्रश्न उत्तरदात्यांना विचारला असता उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की पूर्वी बेरड समुदायामध्ये विवाहाची पद्धत ही ॲरेंज मॅरेज अशी होती. आणि ती सद्यपरिस्थितीतही तशीच आहे.

वरीलप्रमाणे सारणी क्र.४.७ मध्ये बेरड समुदायातील लोकांची पूर्वीची व सद्यपरिस्थितीची वैवाहिक स्थितीची तुलनात्मक माहिती व तिचे विश्लेषण दिलेले आहे. या माहितीला अनुसरूनच बेरड समुदायातील उत्तरदात्यांना असा प्रश्न विचारला होता की सद्यपरिस्थितीत तुमच्या विवाह पद्धतीमध्ये बदल झाले आहेत असे तुम्हाला वाटते का ? तेव्हा उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की बहुतांशी उत्तरदात्यांना (६४%) सद्यपरिस्थितीत त्यांच्या विवाह पद्धतीमध्ये बदल झाले आहेत असे वाटते. तर उर्वरीत (३६%) उत्तरदात्यांना बदल झाल्याचे वाटत नाही. या विवाह पद्धतीमधील बदल झाल्याची व न झाल्याची कारणे व त्यांचे प्रमाण खालील सारण्यांमध्ये दिलेले आहे.

पुढील सारणी क्र.४.८ मध्ये विवाह पद्धतीत बदल झाला आहे असे वाटणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ही ३२ इतकी आहे. तर सदर उत्तरदात्यांनी विवाह पद्धतीत बदल झाल्याची कारणे कोणती सांगितलेली आहेत? व त्याचे प्रमाण किती आहे? ते पुढील सारणीत दिलेले आहे.

**सारणी क्रमांक ४.८**

**बेरड समुदायातील उत्तरदात्यांच्या मते विवाह पद्धतीत बदल झालेली कारणे दर्शविणारी माहिती**


| अ.क्र. | विवाह पद्धतीत बदल झाल्याची कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पारंपरिक पद्धती नष्ट होणे | १८ | ३६.0 % |
| २ | पाश्चिमात्त्यीकरण व आधुनिकीकरणाचा परिणाम | ५ | १0.0 % |
| ३ | शिक्षणाचा प्रसार | ९ | १८.0 % |
| | **एकूण** | **३२** | **१00 %** |

वरील सारणी क्र.४.८ मध्ये असे दिसून येते की बहुसंख्य (३६.0%) उत्तरदात्यांच्या मते पारंपरिक पद्धती नष्ट झाल्याने तर काही (१८.0%) उत्तरदात्यांच्या मते शिक्षणाचा प्रसार झाल्याने आणि उर्वरीत सर्वात कमी (१0.0%) उत्तरदात्यांच्या मते पाश्चिमात्त्यीकरण व आधुनिकीकरणाचा परिणाम झाल्यामुळे विवाह पद्धतीत बदल झाला असे वाटते.

वरील सारणी क्र.४.८ मध्ये दिलेल्या माहितीचे विश्लेषण आलेखाद्वारे दिल्यास अधिक स्पष्ट होईल. सदर माहितीचे विश्लेषण आलेखाद्वारे स्पष्ट केलेले आहे.

**आलेख क्रमांक ४.५**

**बेरड समुदायातील उत्तरदात्यांच्या मते विवाह पद्धतीत बदल झालेली कारणे दर्शविणारा आलेख**



पुढील सारणी क्र.४.९ मध्ये विवाह पद्धतीत वदल झाला नाही असे वाटणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या १८ इतकी आहे.तर सदर उत्तरदात्यांनी विवाह पद्धतीत बदल झाला नसल्याची कोणती कारणे सांगितलेली आहेत ? व त्याचे प्रमाण किती आहे ? ते पुढील सारणीत दिलेले आहे.

### सारणी क्र.४.९
### बेरड समुदायातील उत्तरदात्यांना विवाह पद्धतीत बदल न झाल्यांची कारणे दर्शविणारी माहिती

| अ. | विवाह पद्धतीत बदल न झाल्याची कारणे | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पारंपरिक पद्धती टिकून आहे | ११ | २२.0 % |
| २ | आधुनिकीकरण व पाश्चिमात्यीकरण यांचा प्रभाव कमी | ७ | १४.0 % |
| | **एकूण** | **३२** | **६४ %** |

वरील सारणी क्र.४.९ वरून असे दिसून येते की बहुसंख्य (२२%) उत्तरदात्यांच्या मते अजूनही पारंपरिक पद्धती टिकून असल्याने तसे उर्वरीत (१४%) उत्तरदात्यांच्या मते आधुनिकीकरण व पाश्चिमात्यीकरण यांचा प्रभाव कमी झाल्याने विवाह पद्धतीत बदल झाला नाही.

### सारणी क्र.४.१0
### बेरड समुदायातील लोकांची पूर्वीची व सद्यपरिस्थितील कुटुंबाची व त्यांच्या समुदायाविषयीची तुलनात्मक माहिती

| अ. | परिवर्त्य | उत्तरांचे प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पूर्वी कोणत्या कुटुंब पद्धतीचे प्रमाण जास्त होते? | संयुक्त कुटुंब पद्धती | ५0 | १00 % |
| २ | सद्यपरिस्थितीत कोणत्या कुटुंब पद्धतीचे प्रमाण जास्त आहे? | विभक्त कुटुंब पद्धती | ५0 | १00 % |
| ३ | पूर्वी तुमच्या समुदायात कुटुंब नियोजनाचे नियम होते का? | नाही | ५0 | १00 % |
| ४ | सद्यपरिस्थितीत आहेत का? | होय | ५0 | १00 % |
| ५ | तुमच्या समुदायाचा विशिष्ट असा जात प्रमुख होता का? | नाही | ५0 | १00 % |
| ६ | सद्यपरिस्थितीत जात प्रमुख आहे का? | नाही | ५0 | १00 % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | तुमच्या समुदायाची जात पंचायत होती का? | नाही | ५0 | १00 % |
| ८ | सद्यपरिस्थितीत जात पंचायत आहे का? | नाही | ५0 | १00 % |
| ९ | तुमच्या जातीचे .व इतर जातींच्या व्यक्तीमध्ये भांडणे होत होती का? | होय | ५0 | १00 % |
| १0 | सद्यपरिस्थितीत होतात का? | होय | २३ | ४६ .0% |
| | | नाही | २७ | ५४ .0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| ११ | तुमच्या जातीमध्येच भांडणे होत होती का? | होय | ५0 | १00 % |
| १२ | सद्यपरिस्थितीत होतात का? | होय | २७ | ५४ .0% |
| | | नाही | २३ | ४६ .0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| १३ | पूर्वी तुमच्यात मुलांना दत्तक घेण्याची प्रथा होती काय ? | होय | १९ | ३८ .0% |
| | | नाही | ३१ | ६२ .0% |
| | | **एकूण** | **५0** | **१00 %** |
| १४ | सद्यपरिस्थितीत आहे का? | नाही | ५0 | १00 % |
| १५ | किती वर्षे झाली तुम्ही या गावात राहता? | ८0 वर्षे | १२ | २४ % |
| | | ९0 वर्षे | १३ | २६ % |
| | | १00 वर्षे | २५ | ५0 % |
| | | **एकूण** | ५0 | **१00 %** |

वरील सारणी क्र. ४.१0 मध्ये मुलाखत अनुसूचीद्वारे बेरड समुदायातील उत्तरदात्यांकडून त्यांच्या कुटुंवाविषयीची व समुदायाविषयीची पूर्वीची व सद्यस्थितीची घेतलेली तुलनात्मक माहिती दिली आहे तिचे विश्लेषण खालीलप्रमाणे:-

## कुटुंब पद्धत :

पूर्वी बेरड समुदायामध्ये संयुक्त कुटुंब पद्धतीचे अस्तीत्व मोठ्या (१00%) प्रमाणे होते. परंतु सद्यपरिस्थितीत मात्र बेरड समुदायामध्ये विभक्त कुटुंबाचे प्रमाण जास्त (१00%) आढळते.

**कुटुंब नियोजन :**

बेरड समुदायातील उत्तरदात्यांना पूर्वी तुमच्या समुदायात कुटुंब नियोजनाचे नियम होते का? असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्याकडून उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की पूर्वी बेरड समुदायात कुटुंब नियोजनाचे नियम नव्हते. त्याचे कारण विचारले असता पुढील कारणे आढळून आली. पहिले म्हणजे समाजामध्ये वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी दुसरे म्हणजे जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्यासाठी हे होय. परंतु सद्यपरिस्थितीत मात्र कुटुंब नियोजनाचे नियम दिसून येतात.

**जातप्रमुख :**

पूर्वी बेरड समुदायामध्ये विशिष्ट असा जातप्रमुख नव्हता. आणि तो सद्यपरिस्थितीत ही नाही.

**जातपंचायत :**

बेरड समुदायातील उत्तरदात्यांना पूर्वी तुमच्या समुदायात विशिष्ट अशी जातपंचायत होती का ? असा प्रश्न विचारला होता, तेव्हा उत्तरदात्याकडून उत्तरादाखल माहितीवरून असे स्पष्ट होते की, पूर्वी बेरड समुदायात बेरड समुदायासाठी जातपंचायत नव्हती व ती सद्यपरिस्थितीतही नाही.

**बेरड जातीच्या व इतर जातीच्या लोकामधील भांडणे :**

पूर्वी बेरड समुदायामधील लोकांची आणि इतर जातींच्या लोकांची भांडणे जास्त प्रमाणात होत असत. बेरड समुदायातील उत्तरदात्यांना सद्यपरिस्थितीत बेरड जातींच्या व इतर जातींच्या लोकांमध्ये भांडणे होतात का ? असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्यांनी उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की बहुतांशी (५४%) उत्तरदात्यांच्या मते सद्यपरिस्थितीत भांडणे होत नाहीत. तर उर्वरीत (४६%) उत्तरदात्यांच्या मते सद्यपरिस्थितीत भांडणे होतात. या माहितीवरून असे सिद्ध होते की पूर्वी होणाऱ्या भांडणाचे प्रमाण जास्त होते सद्यपरिस्थितीत त्याचे प्रमाण कमी दिसून येते.

**बेरड जातीतील लोकांमध्येच भांडणे :**

बेरड समुदायामध्ये पूर्वी बेरड समुदायातील लोकांची व इतर जातींच्या लोकांच्या भांडणापेक्षा बेरड जातीतील लोकांमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात भांडणे होत होती. बेरड समुदायातील उत्तरदात्यांना सद्यपरिस्थितीत तुमच्या जातीतील लोकामध्ये भांडणे होतात का ? असा प्रश्न विचारला तेव्हा उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरादाखल माहितीवरून असे स्पष्ट होते की बहुतांशी (५४%) उत्तरदात्यांच्या मते सद्यपरिस्थितीत अजूनही बेरड लोकांमध्ये भांडणे होतात तर उर्वरीत (४६%) उत्तरदात्यांच्या मते सद्यपरिस्थितीमध्ये भांडणे होत नाहीत.

**मुलांना दत्तक घेण्याची प्रथा:**

बेरड समुदायामध्ये पूर्वी मुलांना दत्तक घेण्याची प्रथा असलेली दिसून येते. उत्तरदात्यांकडून मिळालेल्या माहितीवरून असे दिसून येते की बहुतांशी (६२%) बेरड लोक पूर्वी मुलांना दत्तक घेत नसत. परंतु उर्वरीत (३८%) बेरड लोक पूर्वी मुलांना दत्तक घेत असत. सद्यपरिस्थितीत मात्र मुलांना दत्तक घेण्याची प्रथा दिसून येत नाही.

**बेरड लोकांचा गावात राहण्याचा कालावधी :**

मुलाखत अनुसूचीच्याद्वारे निवडलेल्या बेरड समुदायातील उत्तरदात्यांना तुम्ही किती वर्षे झाली या गावात राहता ? असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरादाखल अशी माहिती मिळाली की, बहुसंख्य (५0%) बेरड लोक हे गेली १00 वर्षे झाली या माणगाव गावात राहतात तर काही (२६%) बेरड लोकांना ९0 वर्षे व उर्वरीत (२४%) बेरड लोकांना ८0 वर्षे होतात ते या गावात राहतात.